# स्वच्छता मोहिमेत टाटा पॉवरच्या क्लब एनर्जीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

मुंबई : उर्जा संवर्धनाच्या बाबतीत टाटा पॉवरने हाती घेतलेली राष्ट्रीय चळवळ म्हणजे क्लब एनर्जी. याच क्लबएनर्जीतर्फे उर्जा संवर्धनाच्या बाबतीत लोकांना जागरूक करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम हाती घेतले जातात. याचबांधीलकीनुसार आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनुसार टाटा पॉवरच्या क्लब एनर्जीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छताअभिनायात भाग घेतला होता. निरोगी राहण्यासाठी स्वच्छता किती आवश्यक आहे आणि स्वच्छतेचे महत्त्व समजावूनसांगण्यासाठी मुंबई महानगरपालिकेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत सेंट झेवियर हायस्कूल, सेंट मेरी हायस्कूल आणि कॉस्मोपोलिटन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. स्वच्छता आणि त्याचे फायदे विद्यार्थ्यांना तसेच लोकांना समजावून सांगणे, हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. मुंबईतील जवळपास २२ शाळांमधील आठवी ते १२वी पर्यंतच्या १० हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदवला होता. या सुनियोजित आणि यशस्वी रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी जवळपास ५०हजारपेक्षा जास्त लोकांना स्वच्छतेचा संदेश दिला. या उपक्रमाबद्दल टाटा पॉवरचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी सांगितले की, "टाटा पॉवरचा क्लब एनर्जी हा फक्त एक प्रकल्प किंवा सामाजिक उपक्रम नसून ही एक चळवळ आहे.